# ।। श्री गजानन महाराज अष्टक (दासगणूकृत) ।।

गजानना गुणागरा परम मंगला पावना । अशीव अवघे हरी, दुरीत तेवी दुर्वासना ।।

नसें त्रिभुवना मधे तुजविणे  आम्हां आसरा । करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ।।१।।

निरालसपणें नसे घडलि अल्प सेवा करी । तुझी पतितपावना भटकलो वृथा भूवरी ।

विसंबत न गाय ती आपुलि या कधी वांसरा । करी पदनातावरी बहु दया न रोषा धरा ।।२।।

अलास जगी लावण्या परतुनी सु-वाटे जन । समर्थ गुरूराज ज्या भुषवी नाम नारायण ।।

म्हणून तुज प्रार्थना सतत जोडुनिया करा । करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ।।३।।

क्षणांत जल आणिले नसून थेंब त्या वापिला । क्षणांत गमनाप्रती करिसी इच्छिलेल्या स्थळा ।

क्षणांत स्वरूपे किती विविध धारिसी धीवरा । करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ।।४।।

अगाध करणी तुझी गुरूवरा, न लोकां कळे । तुला त्यजुनी व्यर्थ तेआचरितात नाना खुळे।

कृ पा उदक मागती त्यजुनी गौतमीच्या तिरा । करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ।।५।।

समर्थस्वरूपाप्रती धरून साच बाळापूरी । तुम्ही प्रगट जाहलां सुशील बाळकृ ष्णा घरी ।

हरिस्वरूप घेऊनी  दिधली भेट भीमातिरा । करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ।।६।।

सच्छिद्र नौकेप्रती त्वदिय पाय हे लागतां  । जलांत बुडतां तरी तिजसि नर्मदा दे हाता ।

अशा तुजसि वाणण्या नच समर्थ माझी गिरा । करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ।।७।।

अतां न बहु  बोलतां तव पदांबुजा वंदितो । पडो विसर ना कदा मदिय हेंचि मी मागतों ।

तुम्ही वरद आपुला कर धरा गणूच्या शिरा । करी पदनतावरी बहु दया न रोषा धरा ।।८।।